

www. sahyandrinews.com

# दैनिक सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

अवघें जेणें पाप नासे ।
तें हें असे पंढरीसी ॥१॥
गात जागा गात जागा ।
प्रेम मागा विठ्ठला ॥२॥

आषाढी एकादशी निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा...
-संपादक

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २७८ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१७ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


## थोडक्यात

### महायुतीत बरीच गडबड, अनेक नेते आमच्या संपर्कात

**सातारा**–राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळांनी घेतलेल्या शरद पवारांच्या भेटीवरून वेगवेगळे तर्क लढवले जात आहेत. अशातच काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते आ. बाळासाहेब थोरात यांनी मोठा दावा केला आहे. महायुतीत बरीच गडबड असून अनेक नेते आमच्या संपर्कात यायला सुरूवात झाली असल्याचा खळबळजनक दावा त्यांनी केला. ते कराडमध्ये माध्यमांशी बोलत होते.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री दिवंगत विलासकाका उंडाळकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचं अनावरण कराडमध्ये झालं. त्यानंतर माध्यमांशी बोलताना आ. बाळासाहेब थोरात म्हणाले की, शरद पवारांच्या भेटीबद्दलचं कारण भुजबळांनी सांगितलं असेल तर आनंदाची गोष्ट आहे. परंतु, दुसरंही कारण असू शकत, असेही बाळासाहेब थोरात म्हणाले.विधान परिषद निवडणुकीत क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांची फडणवीस आणि अजितदादांसोबत बैठक झाली होती, या मुनगंटीवारांच्या वक्तव्यावर आ. बाळासाहेब थोरात म्हणाले, ते आम्हाला माहीत नाही. परंतु, काही लोकांनी क्रॉस वोटिंग केलं असून त्याबाबतची विश्वसनीय माहिती आमच्याकडे आली आहे. त्याबद्दलचा अहवाल आम्ही दिल्लीला पाठवला आहे. संबंधितांबद्दलचा निर्णय योग्य वेळी होईल.

### अजितदादांमुळे २०१४ पूर्वी आघाडी तुटली

**मुंबई**–युतीमध्ये मीठ कसे टाकावे हे अजित पवार यांच्याकडून शिकायला हवे. २०१४ पूर्वी आमची आघाडी तुटण्याचे कारणच अजित पवार होते, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.दरम्यान जितेंद्र आव्हाड पुढे बोलताना म्हणाले की, अजित पवार सरकारमध्ये असताना यांची फाईल मागव, त्यांची फाईल मागव असे करत बैठकी घेत होते. त्यांचे असंवैधानिक पद असताना ते बैठकी बोलवत होते पण पवार साहेबांमुळे कुणी बोलत नव्हते, असे आव्हाडांनी म्हटले आहे.जितेंद्र आव्हाड म्हणाले की, शरद पवारांना राग येईल म्हणून कोणते मंत्री काही बोलत नव्हते. हिंदुत्व म्हणजे नेमके काय? विधान परिषद निवडणुकीत मुस्लिमांची मते चालतात कशी असा सवाल आव्हाडांनी उपस्थित केला आहे. इतका मुस्लिम द्वेष का, कशासाठी असा सवाल आव्हाडांनी उपस्थित केला आहे. मुस्लिमांना मारणार आणि त्यांची मते घेणार हे कसे चालते, एकदा सांगूण टाकावे ना की मुस्लिमांची मते नको आम्हाला असे आव्हाडांनी म्हटले आहे.

### जरांगेंनी उपोषण करण्यापेक्षा २८८ जागा लढवल्या पाहिजे

**मुंबई**–राज्यात सध्या मराठा- ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून वातावरण तापले आहे. त्यातच मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकारने मागण्या मान्य न केल्यास निवडणुकीत उतरणार असल्याचा इशारा यापूर्वी दिला होता. तसेच नुकतेच छत्रपती संभाजीनगरमध्ये मनोज जरांगे यांची शांतता रॅली पार पडली. यावेळी त्यांनी येत्या २० जुलैपासून पुन्हा उपोषण करणार असल्याचा निर्णय जाहीर केला आहे. मात्र यावरून आता वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे यांना सल्ला दिला आहे. मनोज जरांगे यांनी उपोषण करण्यापेक्षा २८८ जागा लढवल्या पाहिजेत असे आंबेडकर म्हणाले आहेत.प्रसार माध्यमांशी बोलतांना प्रकाश आंबेडकर यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, ''मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे, ही मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे. या मागणीसंदर्भात राजकीय पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. अशा आशयाचे पत्र द्यायचे असे सर्वपक्षीय बैठकीत ठरले होते. मात्र, अद्याप तरी वंचित बहुजन आघाडीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पत्र आलेले नाही. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत खुलासा करावा आणि ते कधीपर्यंत पत्र पाठवणार आहेत हे सांगावं'', असे आंबेडकर म्हणाले.

# मविआचे सरकार आल्यास जनहिताच्या योजना बंद होणार

## विरोधकांचे जातीपातीचे राजकारण जनतेने बघितलंय–चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)–विरोधकांचे जातीपातीचे राजकारण संपूर्ण जनतेने बघितले आहे. पुढे राज्यात मविआचे सरकार आले तर जनहिताच्या योजना बंद होतील अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. तसेच महाराष्ट्रातील जनतेला डबल इंजिन सरकारच पाहिजे असल्याचा दावाही बावनकुळे यांनी केला आहे. आज प्रसार माध्यमांशी ते बोलत होते.**



राज्यातील सरकारने आरक्षणाच्या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीला विरोधकांनी दांडी मारली होती. यावरून सत्ताधारी नेते विरोधकांवर टीका करत असल्याचे पाहायला मिळत आहे. याप्रकरणी चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. विरोधकांनी बैठकीला न येणे हा निंदनीय प्रकार आहे. अशी भूमिका महाराष्ट्राच्या हिताची नाही. विरोधकांचे जातीपातीचे राजकारण जनतेला दिसले आहे. चुकून राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आले, तर लोकांच्या हिताच्या योजना बंद होतील. महाराष्ट्रातील जनतेला डबल इंजिन सरकार पाहिजे आहे'', असे बावनकुळे म्हणाले.

तसेच विधानसभेसाठी राज्यात भाजपकडून जय्यत तयारी केली जात आहे. यासाठी भाजपकडून संवाद यात्रा काढली जाणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी १९ नेत्यांच्या नेतृत्त्वातील संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यातील कानाकोपऱ्यात पोहचणार आहेत. येत्या २१ जुलै रोजी पुण्यामध्ये राज्यातील ५ हजार भाजपा पदाधिकाऱ्यांचे अधिवेशन होणार आहे. त्यात भाजपचे नेते केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत संवाद यात्रेविषयी अंतिम रूपरेषा तसेच तारीख ठरणार आहे'', अशी माहिती बावनकुळेंनी दिली.तसेच पुढे ते म्हणाले, ''महाराष्ट्रातील भाजपाचे १९ वरिष्ठ नेते संवाद यात्रेत सहभागी होतील. ही यात्रा सर्व ४८ लोकसभा, सर्व विधानसभा तसेच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गट आणि नगर पालिका क्षेत्रात पोहचेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्या सरकारने तिसऱ्या टर्ममध्ये घोषित केलेली कामे आणि महायुती सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या कामाची माहिती, सरकारने घेतलेले निर्णय जनसामान्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहेत. समाजातील सर्व घटकांना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ मिळेल, यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. या संवाद यात्रेचा समारोप विधानसभानिहाय होणार असल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळेंनी दिली आहे.



नागभीड तालुक्यातील बागलमेंढा येथे रोवणी हंगाम चालू झाला असून एका शेतात पऱ्हे काढतांना शेतमजूर. छाया :प्रणय बांगरे.

# १८ ऑगस्ट रोजी आलापल्लीत भव्य रोजगार मेळावा

## युवक–युवतींनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे–मंत्री धर्मराव बाबा आत्राम

**अहेरी । प्रतिनिधी**

जिल्ह्यात मोठमोठ्या प्रकल्पाच्या माध्यमातून जास्तीत जास्त रोजगार निर्मितीला चालना देण्याचा प्रयत्न सुरू असून येत्या १८ ऑगस्ट रोजी आलापल्ली येथील क्रीडा संकुल आवारात भव्य रोजगार मेळावा घेण्यात येत आहे. त्या मेळाव्यात जास्तीत जास्त बेरोजगार युवक–युवतींनी उपस्थित राहून या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी केले आहे.



जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात कोनसरी येथील लोह प्रकल्पासोबतच अहेरी तालुक्यातील वडलापेठ येथे सुरजागड इस्पात कंपनीच्या स्टील प्रकल्प होऊ घातला आहे.यासह आणखी काही प्रकल्प होणार आहेत.त्यासाठी विविध कंपन्या कोट्यवधी रुपयांचा गुंतवणूक करणार आहेत.या प्रकल्पामध्ये स्थानिक बेरोजगारांना संधी देण्यात येणार असून येत्या १८ ऑगस्ट रोजी आला पल्ली येथील क्रीडा संकुल आवारात भव्य रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे.लोकांनी मोठ्या अपेक्षेने आपल्याला निवडून दिले असून सिंचन, शिक्षण आणि रोजगार यावर आपला भर आहे.येथील शेती सुजलाम सुफलाम व्हावी म्हणून विविध ठिकाणी उपसा सिंचन करून पाण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.शिक्षणासाठी तर काम सुरूच आहे.बेरोजगारांच्या हाताला काम मिळावं या उदात्त हेतूने मोठमोठे प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. १७ जुलै रोजी सुरजागड इस्पात कंपनीच्या स्टील प्रकल्पाचे भूमिपूजन होणार त्यांनतर अडीच हजार कोटींचा आणखी एक प्रकल्प होणार आहे.त्यामुळे सुशिक्षित युवक–युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भव्य रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी केले आहे.

# विष्णुमय जग अभंगाच्या कार्यक्रमाचे आयोजन

**वर्धा । प्रतिनिधी**

संस्कार भारती वर्धा जिल्हा व स्व. सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा ग्रंथालय वर्धा यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त अभंगाचा कार्यक्रम विष्णुमय जग आयोजित करण्यात आला आहे.

स्वर्गीय सत्यनारायण बजाज सार्वजनिक ग्रंथालय वर्धा येथे बुधवार दिनांक १७ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजता कार्यक्रम प्रारंभ होणार आहे. अभंगाचे निरूपण नागपूर येथील आशुतोष अडोणी करणार असून अभंग गायन व्ही पी कवीनेसन, केतकी कुळकर्णी, नितीन वाघ, अनघा रानडे, अमित लांडगे करणार आहे.वाद्यवृंद साथ बासरी अरविंद उपाध्ये, व्हायोलीन वसंतराव जळीत, संवादिनी नरेंद्र माहुलकर, तबला शाम सरोदे, मृदंग मंगेश परसोडकर,टाळ दिलीप झाडे, निलय परसोडकर देणार आहेत. जिल्ह्यातील भाविक, संगीतप्रेमी व सर्वच नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्कार भारतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोटंबा शिवारात विज पडून शेतकऱ्याचा मृत्यु

**सेलू । प्रतिनिधी**

नजिकच्या कोटंबा येथे शेतात गेलेला शेतकरी, पाऊस आल्यामुळे काम थांबवून शेतात उभा असताना शेतकऱ्याच्या अंगावर विज पडुन जागीच मृत्यु झाला.

ही घटना १४ जुलै रविवारी सायंकाळी ४-३० ते ६ वाजता दरम्यान कोटबा शिवारात घडली. मोरेश्वर देवीदास वांदीले (वय ४५ वर्षे ) रा.कोटबा असे मृतकाचे नाव आहे . दुपाराच्या सुमारात महाबळा परिसरात विजाच्या कडकडाटासह पाऊस आल्यामुळे शेतकरी मोरेश्वर वांदिले हे झाडाखाली थांबले. त्याच वेळेला कोसळलेली विज त्यांच्या अंगावर पडली. त्यात त्यांचा जागीच मृत्यु झाला.घटनेची माहिती मिळताच शेताकडे अनेकांनी धाव घेतली.ही माहिती गावकऱ्यांना दिली.

विज पडून मृत्यु झाल्याने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.



# कारागृह परिसरातील तलावांमध्ये मत्स्यसंवर्धनास सुरुवात

## एस.टी.आर.सी.गोंडवाना विद्यापीठ आणि माफसू यांचा संयुक्त उपक्रम

**गडचिरोली । प्रतिनिधी**

कारागृहातील बंद्यांना भविष्यात आर्थिक आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी कौशल्य आधारीत प्रशिक्षण देण्याकरीता गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती कारागृह प्रशासन प्रयत्नशील आहे.कारागृहातील बंद्यांसाठी मत्स्यपालन हा व्यवसाय उत्पादन आणि उत्पन्नाचे साधन ठरू शकतो. याअनुषंगाने, विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र (एस.टी.आर.सी.), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, कारागृह परिसरातील चार तलावांची मत्स्यपालनाकरीता निवड करण्यात आली. या तलावांमध्ये पावसाळी हंगामात मत्स्यबीजांचे संचयन करण्याच्या दृष्टीने दि. ७ जुलै, २०२४ रोजी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी गडचिरोली येथील जिल्हा मध्यवर्ती कारागृहास भेट दिली. यावेळी कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते इंडियन मेजर कार्प माशांचे फ्राय आकाराचे ३० हजार मत्स्यबीज तलावांमध्ये सोडण्यात आले.



याप्रसंगी नागपूरचे (माफसू) शिक्षण संचालक डॉ. एस. व्हि. उपाध्ये, अधिष्ठाता (मत्स्य), डॉ. एस. डब्ल्यु. बोंडे, तुरूंग प्राधिकरण गडचिरोलीचे संचालक संजय त्रिपाठी, मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त समीर डोंगरे, एस.टी.आर.सी.चे मुख्य कार्यक्रम अधिकारी व प्रमुख आशीस घराई, पशुआहार विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अतुल ढोक, ग्रोवेल फीड्सचे साईनाथ चव्हाण, एस.टी.आर.सी.चे वैज्ञानिक अधिकारी अजय शहारे तसेच गोंडवाना विद्यापीठ आणि कारागृह विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.याप्रसंगी, बोलतांना माफसूचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी मत्स्यव्यवसाय आणि पशुसंवर्धन हे उपयुक्त शेतीपूरक व्यवसाय असून शेतकऱ्यांनी भरघोस उत्पन्नाकरीता एकात्मिक शेती करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. त्यासोबतच, कुलगुरू डॉ. पाटील यांनी कारागृह विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्याची प्रशंसा केली. तसेच बंद्यांमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांना यश मिळेल ही सदिच्छा व्यक्त केली.कारागृह अधिक्षक श्री. कोकाटे यांनी कारागृहातील बंदी शिक्षा भोगून बाहेर प्रवेश केल्यानंतर ते आत्मनिर्भर होण्याकरीता कारागृह प्रशासन राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती कुलगुरू डॉ. पाटील यांना दिली. तदनंतर, कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते इंडियन मेजर कार्प माशांचे फ्राय आकाराचे ३० हजार मत्स्यबिज तलावांमध्ये सोडण्यात आले. मत्स्यबिजांची योग्य वाढ होण्याकरीता मत्स्यबिजांचे खाद्य, पाण्याची गुणवत्ता टिकून राहण्याकरीता औषधी आदी साहीत्य प्रशासनाला पुरविण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता माफसू संयुक्त प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. प्रशांत तेलवेकर, सह-संशोधक डॉ. राजीव राठोड, एस.टी.आर.सी. गडचिरोली येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## क्षमता तयार करण्यासाठी विविध कला उपक्रमाचे सातत्य हवे-कुलगुरू प्रा.सी.एम.त्यागराज

# राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगाव (कर्नाटक) व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा (महाराष्ट्र) मराठी विभाग आयोजित राष्ट्रीय कार्यशाळा बेळगावमध्ये संपन्न

**बेळगांव (कर्नाटक) । प्रतिनिधी**

आजच्या काळात केवळ पैशाचा प्रश्न महत्वाचा नसून शिक्षणात क्षमतेचा प्रॉब्लेम आपल्याला जाणवत आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमता वाढीसाठी कौशल्यवृद्धीसाठी पर्यावरण निर्माण करून देणारे आणि विद्यार्थ्यांना आनंदाने शिक्षण देणाऱ्या शिक्षकांची गरज जाणवत आहे.विद्यार्थ्यांना भाषिक व अन्य कला विषयक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी नृत्य,नाट्य,संगीत,साहित्य कला महोत्सव आपण सुरु केले पाहिजेत. विद्यार्थ्यांना आनंद मिळायला हवा आणि शिक्षण मिळायला हवे.केवळ मार्क्स मिळवण्यासाठी शिक्षण नसून विविध प्रकारच्या क्षमता विद्यार्थ्यांना मिळतील या साठी पर्यावरण तयार करा.मराठी विभागात मोठ्या प्रमाणात वर्षभर नवनवीन उपक्रम सुरु ठेवावेत.भाषेशी संबंधित गायन,वादन,नाटक सादरीकरण,वक्तृत्व,साहित्यलेखन,संशोधन झाले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी सजग असावे. विद्यार्थ्यांनो तुमच्याकडे ज्ञान असेल तर तुम्हाला भय किंवा चिंता करण्याची गरज नाही. क्षमता तयार करण्यासाठी विविध कलाविषयक उपक्रमाचे आयोजन मराठी विभागात करायला हवे''असे विचार राणी चन्नम्मा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सी.एम. त्यागराज यांनी व्यक्त केले.राणी चन्नम्मा विद्यापीठातील मराठी विभाग व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजचा मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने.मराठी भाषा आणि साहित्य : संशोधनाच्या नव्या दिशा या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उद्घाटन समारंभात कुलगुरू बोलत होते. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ साताराच्या भाषा मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.डॉ सुभाष वाघमारे, मराठी विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत वाघमारे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. नंदकुमार मोरे, गोवा विद्यापीठ मराठी विभागातील प्रा. विनय मडगावकर, डॉ. मनीषा नेसरकर, प्रा. डॉ. मैजुद्दीन मूतवल्ली, डॉ. संजय कांबळे उपस्थित होते. प्रारंभी रोपट्याला पाणी घालून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाशी सलग्न महाविद्यालयातील मराठी विभागातील विद्यार्थी , विद्यापीठातील विद्यार्थी , प्राध्यापक यांचेशी संवाद साधत कुलगुरू त्यागराज पुढे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनो नेहमीच वाचन करत रहा. बोलण्याची व शिकण्याची कला महत्त्वाची आहे. सतत नवनवीन कल्पना राबविल्या पाहिजेत. तुम्ही लिहिते व्हा. तुमची आकलन क्षमता वाढवा. आपल्या वयातील २० ते ४० हा टप्पा खूप महत्त्वाचा आहे. यातून आपल्याला खूप काही करता येते. ती तळमळ स्वतः ठेवली पाहिजेत. माझ्या चार वर्षांच्या कार्यकाळात




माझ्याकडून जितके सहकार्य हवे तितके मी देईन. मराठी विभाग चांगला झाला पाहिजे. नेहमीच साहित्याची पूजा करा, असेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा.डॉ.सुभाष वाघमारे म्हणाले की ' संशोधन हे मानवी हितासाठी करायचे असते. संशोधनाची सुरुवात प्रश्न किंवा समस्येपासून होते. वाचनातून किंवा भोवतालच्या पर्यावरणात जगताना आपल्याला समस्या जाणवतात. समस्येचे यथार्थ आकलन करून घेणे म्हणजे सत्य शोधणे असते. संशोधनात सत्याचा शोध जसा महत्वाचा तसे हिताचे काय याचा शोध पद्धतशीरपणे मांडणे आवश्यक असते. संशोधक विद्यार्थी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे असायला हवेत. प्रॉब्लेम ऑफ रुपी हा प्रबंध त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिकस मध्ये सादर केला. ब्रिटीश सरकार पौंडच्या तुलनेने रुपयांचे अवमूल्यन करून शोषण करीत आहे. असा निष्कर्ष त्यांनी पुराव्यानिशी मांडला. ब्रिटीश सरकारला दोष देणारे लेखन म्हणून परीक्षकांनी प्रबंध आशयात बदल करा अन्यथा डॉक्टरेट पदवी देता येणार नाही असे सांगितले. डॉ .आंबेडकर यांनी ब्रिटीश सरकारच्या अहवालाचे आधारे लेखन केल्याचे सांगून आशयातील शब्दही एक बदलणार नाही अशी भूमिका घेतली.आपल्या निष्कर्षावर ठाम राहण्याचे धैर्य त्यांनी अभ्यासामुळे दाखवले होते. त्यामुळे परीक्षक देखील विचारात पडले.शेवटी आशय न बदलता भाषा सौम्य करून घेत त्यांनी बाबासाहेब यांना डी.एस.सी पदवी दिली . देशाच्या हितासाठी योग्य विषय निवडून सत्य परिस्थिती दाखवणारे संशोधन बाबासाहेब यांनी केले. संशोधक विद्यार्थ्यांनी अभ्यास करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घ्यावा. या प्रकारचे संशोधन विद्यार्थ्यांनी करायला हवे .आपले प्रबंध समाज उपयोगी असावेत.समाजातले प्रश्न शोधा त्यावर संशोधन करा, असेही ते म्हणाले.प्रास्ताविकात डॉ. चंद्रकांत वाघमारे यांनी मराठी विभागातील उपक्रमांची माहिती दिली. डॉ. नेसरकर यांनी कुलगुरू व पाहुण्यांची ओळख करून दिली. स्वागत गीत पूजा कांबळे यांनी म्हटले.. सूत्रसंचालन नविजन कांबळे यांनी केले. आभार डॉ.संजय कांबळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी पीएच.डी.चे विद्यार्थी सुधाकर जोगळेकर, संतोष मादाकाचे, सुवर्णा पाटील, पूजा कांबळे, प्रियंका भांदुर्गे, नेहा देसाई आदीने परिश्रम घेतले. सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक व विद्यार्थी, तसेच विद्यापीठांशी सलग्न असणाऱ्या कर्नाटकातील विविध महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक व विद्यार्थी या कार्यशाळेला उपस्थित होते.

# १५ वे शब्दगंध साहित्य संमेलन स्मरणिकेचे बुधवार १७ जुलै रोजी कोहिनूर मध्ये प्रकाशन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य आयोजित पंधरावे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेचे प्रकाशन बुधवार दिनांक १७ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वा. कोहिनूर मंगल कार्यालय अहमदनगर येथे अहमदनगर शहराचे आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती शब्दगंध चे अध्यक्ष राजेंद्र उदागे व संस्थापक सुनील गोसावी यांनी दिली.

या स्मरणिकामध्ये गेल्या दोन वर्षातील कार्यवृत्तांत, शाखांनी राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती व पंधराव्या शब्दगंध साहित्य संमेलनाची क्षणचित्रे प्रकाशित करण्यात आलेले आहेत.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ.संजय कळमकर, राज्य मराठी भाषा सल्लागार समितीचे सदस्य जयंत येलूरकर , माजी संमेलनाध्यक्ष प्राचार्य शिवाजीराव देवढे, हिंदू सेवा मंडळाचे माजी




अध्यक्ष प्रा.मधुसूदन मुळे, सारडा महाविद्यालयाच्या

प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, शब्दगंध चे सल्लागार प्राचार्य डॉ. जी.पी.ढाकणे,प्राचार्य चंद्रकांत भोसले,बापूसाहेब भोसले, ज्ञानदेव पांडुळे, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे जिल्हा समन्वयक शशिकांत नजान, महानगर शाखा नाट्य परिषदेचे प्रसाद बेडेकर, अहमदनगर नाट्य परिषदेचे अमोल खोले आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी या कार्यक्रमास साहित्यिक व साहित्य रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन शब्दगंध साहित्यिक परिषदेचे संस्थापक, सचिव सुनील गोसावी,अध्यक्ष राजेंद्र उदागे, खजिनदार भगवान राऊत, कार्याध्यक्ष प्रा.डॉ.अशोक कानडे, उपाध्यक्ष भारत गाडेकर, डॉ. गुंफा कोकाटे,कार्यवाहक सुभाष सोनवणे, अजयकुमार पवार,डॉ.तुकाराम गोंदकर, सुनील धस, राजेंद्र फंड,राजेंद्र चोभे,शर्मिला गोसावी,किशोर डोंगरे, रामकिसन माने, बबनराव गिरी, स्वाती ठुबे, राजेंद्र पवार, हरिभाऊ नजन,शेवगाव, डॉ.संजय दवंगे,कोपरगाव,डॉ. किशोर धनवडे,नेवासा,डॉ.अनिल पानखडे,पाथर्डी,जयश्री इंगळे, राहुरी,लेविन भोसले, श्रीरामपूर यांनी केले आहे.

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात आषाढी दिंडीचे आयोजन

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

वडाळा महादेव येथील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त शाळेपासून ते गावातील महादेव मंदिरापर्यंत पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे उद्धवराव पवार आणि मुख्याध्यापक ज्ञानदेव माळी यांच्या हस्ते पालखीतील श्रीविठ्ठल व रखुमाई यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानदेव माळी यांनी विद्यार्थ्यांना दिंडीसाठी शुभेच्छा दिल्या. या दिंडी बरोबरच वृक्षदिंडी व ग्रंथदिंडीचेही आयोजन करण्यात आले होते. झाडे लावा झाडे जगवा तसेच ग्रंथ आपले गुरु अशा घोषणा तर विठ्ठल विठ्ठल नामघोष करत दिंडी निघाली. झांज पथकाने दिंडीचे नेतृत्व केले. या दिंडीमध्ये श्रीविठ्ठल ,रखुमाई तसेच संत ज्ञानेश्वर यांच्या वेशभूषेत आलेले विद्यार्थी दिंडीचे प्रमुख आकर्षण ठरले.



दिंडीच्या स्वागतासाठी ग्रामस्थांनी रांगोळ्या काढल्या. श्रीविठ्ठल रखुमाईचे पूजन करून दिंडीचे स्वागत केले. वारकऱ्यांच्या वेषात आलेल्या विद्यार्थ्यांनी फुगडी खेळून आनंद लुटला. पालखी मंदिरात पोहोचल्यानंतर विद्यार्थ्यांनी दर्शन घेऊन टाळ वाजवत भजने म्हटली. विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका निंभोरे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांना प्रसाद म्हणून राजगिऱ्याचे लाडू देण्यात आले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रज्ञा कासार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. यावेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब कासार, स्वेजल रसाळ, उषा नाईक, संतोष नेहूल, भास्कर सदगीर, दिपाली बच्छाव, अविनाश लाटे, सुनीता बोरावके, प्रशांत बांडे, अशोक पवार, संदीप जाधव व भास्कर शिंगटे हे उपस्थित होते.

# विविध शाळांच्या दिंड्यांनी अवघे दुमदुमले बेलापूर !



**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील बेलापूर येथील जे.टी.एस. हायस्कूल,साई इंग्लिश मिडीयम स्कूल, समता न्याती स्कूल,जिल्हा परिषद मुले व मुलींच्या शाळांच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीच्या पार्श्वभुमीवर दिंडीचे आयोजन केले होते. या दिंडीमुळे अवघे बेलापूर विठ्ठलाच्या गजराने दुमदुमले.

या शाळांमधील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारक-यांचा पहेराव परिधान केला होता. कपाळी टिळा,गळ्यात टाळ, मुलीही नऊवारी साडी, नाकात नथ,गजरा घालून दिंडीत सहभागी झाल्या होत्या. हरिनामाच्या गजराने या दिंडीने गावक-यांना आकर्षित केले. गावातील क्रांती चौक (झेंडा चौक) ते विठ्ठल मंदिर अशी हि दिंडी निघाली.दिंडीचे जिल्हा परिषद सदस्य शरद नवले,बाजार समितीचे उपसभापती अभिषेक खंडागळे,सरपंच स्वाती आमोलिक,उपसरपंच मुश्ताक शेख,बेलापूर एज्युकेशन संस्थेचे अशोकनाना साळुंके,रविन्द्र खटोड,साई प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास चायल यासह ग्रामपंचायत सदस्यांनी स्वागत करुन मुलांचे कौतुक केले.या दिंडीसाठी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पी.ए.इनामदार शाळेत हेड बॉय आणी हेड गर्ल निवडणूक उत्साहात संपन्न

## विजयी विद्यार्थी उमेदवारांना आ.संग्राम जगताप यांनी दिली शपथ

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येस फौंडेशन संचलित गोविंदपूरा मुकुंदनगर येथील पी.ए.इनामदार इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हेड बॉय आणि हेड गर्लसाठी निवडणुका घेण्यात आल्या. शाळेत या निवडणुकीत उभे राहण्यासाठी इयत्ता १० वी आणि ९ वी मधील विद्यार्थ्यांना पात्र धरण्यात आले त्यानुसार १० वी तील विद्यार्थी हेड बॉय आणि गर्ल साठी तसेच ९ वीचे विद्यार्थी असिस्टण्ट हेड बॉय आणि गर्ल साठी निवडणुकीला उभे राहिले आणि सुरु झाली शाळेतील या निवडणुकांची लगबग मागील आठवडा भरात शाळेत या निवडणुकीचे वातावरण अत्यन्त रंगतदार असे बनले होते. अत्यंत उत्साहाच्या वातावरणात या निवडणुकीत उभ्या असलेल्या विद्यार्थी उमेदवारांनी संपूर्ण शाळेत प्रचार केला, त्यांना प्रत्येक वर्गात ५ ते ६ मिनिटे प्रचार भाषण




करण्यास लावण्यात आले आणि विद्यार्थ्यांनीही जोमात प्रचार केला, पॅम्प्लेट्स वाटले आणि भिंतींवर बॅनर लावले आणि मतदानाच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी डिजिटली वोटिंग मशीनवर मते दिली आणि नंतर मतमोजणी झाली व विजयी उमेदवार घोषित करण्यात आले, यातशाळेच्या हेडगर्ल पदी जेबा समीर शेख,असिस्टंट हेड गर्ल पदी माहिनूर आदिल शेख व हेड बॉय पदी यासीन अन्सार शेख,असिस्टंट हेड बॉय पदी जुनेद युनूस शेख हे निवडून आलेया विद्यार्थ्यांना त्यांनी निवडणुकीत प्राप्त केलेल्या पदांची आमदार संग्राम जगताप यांनी शपथ दिली व या पदांचे बॅच त्यांच्या हस्ते लावण्यात आले तसेच पुढील वाटचालीस आ. जगताप यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष साहेबान जहागीरदार, महासचिव अब्दुल रऊफ खोकर, संस्थेचे चेअरमन अब्दुल रहीम खोकर, इंजि. इकबाल शेख, विकार काझी, शब्बीर अहमद, प्राचार्य फिरोज अली आदींसह पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमय्या शेख यांनी केले आभार अब्दुल रऊफ खोकर यांनी मानले.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी

# योजनेच्या अंमलबजावणी साठी सर्व विभागांनी एकत्रित व समन्वयाने काम करा-जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

**अहमदनगर । प्रतिनिधी**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील अधिकाधिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देत योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन जिल्हा अग्रेसर राहील यादृष्टीने सर्व विभागांनी एकत्रित व समन्वयाने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री सालीमठ बोलत होते.यावेळी कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक संचालक निशांत सुर्यवंशी यांच्यासह संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी, विविध कंपन्या, जिल्ह्यातील औद्योगिक संघटना, खासगी आस्थापनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ म्हणाले की, या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या ्.ारहर्रिूरा.सॅीं.ळप या संकेतस्थळाच्या माध्यमातुन रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करुन देणारे उद्योजक जोडले जातील. रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातुन मिळुन त्यांची क्षमतावाढ होईल. तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ या माध्यमातुन मिळणार आहे. १८ ते ३५ वर्षे वय असलेल्या युवकांना योजनेमध्ये सहभागी होता येणार असुन या योजनेंतर्गत १२ वी पास असणाऱ्या युवकांना ६ हजार रुपये, आय.टी.आय अथवा पदविका धारकांना ८ हजार रुपये तर पदवीधर, पदव्युत्तर युवकांना १० हजार रुपये शासनाकडुन डीबीटीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या



बँक खात्यामध्ये

विद्यावेतन सहा महिन्यांसाठी देण्यात येणार असुन अतिरिक्त विद्यावेतन देण्यास आस्थापनांना मुभा राहणार आहे. योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना-उद्योजकाकडे एकुण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येणार असल्याचेही जिल्हाधिकारी श्री सालीमठ यांनी यावेळी सांगितले.जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सहकारी साखर कारखाने, दुध डेअरी, सहकारी सोसायटी तसेच विविध लघु व मध्यम उद्योग, विविध बँका, शासकीय, निमशासकीय आस्थापना आहेत. या आस्थापनांना सातत्याने कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासते. या सर्व आस्थापनांसोबत एकत्रित बैठक घेण्यात येऊन त्यांच्याकडुन त्यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची माहिती एकत्रित करण्यात येऊन मागणीनुसार युवकांना रोजगारच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी श्री सालीमठ यांनी यावेळी दिले.बैठकीत विविध विभागाचे प्रमुख अधिकारी, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपयुक्त अशा सुचना केल्या.

# राजेगाव येथील मजूर महिला सोबत घडला प्रकार ;मारफळ येथे शेतकऱ्यांकडून मजूर महिलांना दगडाने केली मारहाण

## वंचित बहुजन आघाडीची मागणी आरोपींना तात्काळ अटक करा-विष्णू देवकते

**बीड । प्रतिनिधी**

राजेगाव येथील महिला कामानिमित्त मारफळ येथे गेल्या होत्या त्यांनी काम लवकर उरकले व ठरल्याप्रमाणे गुत्त्याचे पैसे मागितले, शेतकऱ्याने दिले नाही खुज्जत घातली व दगडाने मारहाण केली. ही घटना गेवराई तालुक्यातील मारफळे येथे घडलो गेवराई विधानसभा मतदारसंघातील राजेगाव येथील वंचित समूहातील महिला खुरपणीसाठी मारफळा ता.गेवराई येथे गेले असता राजेगाव येथील काही महिला मारफळा तांडा यथे शेतात खुरपणी साठी गेल्या असता त्यांनी खुरपणी च काम गुत्ते घेतले होते.महिलांनी दिवसभर दुपारी न जेवण करता न बसता खुरपणीचं काम पूर्ण केले काम पूर्ण झाल्यानंतर तुम्ही एवढ्या लवकर खुरपणी कशी काय झाली मनत शेतकऱ्याने पैसे देण्यास नकार दिला.संध्याकाळी खुरपणीचं काम संपल्यानंतर महिलांनी ठरलेल्या रोजंदारीच्या पैशांची मागणी केली असता संबंधित शेतकऱ्यांनी महिलांना रोजंदारीच्या पैशासाठी नकार दिल्यानंतर महिलांना व रिक्षा चालकाला



अश्लील भाषेत जातीवाचक शिवीगाळ करून दगडाने हनमार करण्यास सुरुवात केली.या मारहाणी मध्ये काही महिला जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे.अशा जातीयवादी व निच प्रवृत्तीच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर निषेध केला आहे .यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते इंजि.विष्णु दादा देवकते,वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष पप्पू गायकवाड तालुका महासचिव किशोर भोले,पप्पू वाव्हळ, अखिल भाई,वंचित बहुजन आघाडी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी राजेगाव येथे जाऊन मारहाण झालेल्या महिला भगिनींची,रिक्षा चालक व त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सर्व कुटुंबियांना धीर दिला. जोपर्यंत महाराज झालेल्या महिला न्याय मिळत नाही तोपर्यंत वंचित बहुजन आघाडी आपल्या सोबत आहे. ज्या ज्या वेळेस कुठेही अडचण निर्माण होईल त्या त्या वेळेस वंचित आघाडी तुमच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहोत असा शब्द दिला. संबंधित आरोपीवर गुन्हा दाखल झालेला असून लवकरात लवकर आरोपींना अटक करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तलवाडा पोलीस स्टेशनचे पीआय यांच्याकडे करण्यात आली.

# कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त जि.प.प्रा.शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

### सरपंच श्रीकांत भाऊ फड यांच्या माध्यमातून मंत्रीमहोदयांच्या वाढदिवस सामाजिक उपक्रम राबविण्यात आले



**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील मौजे दावतपूर येथील जि.प.प्रा. शाळेत राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री मा.ना. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच श्रीकांत भाऊ फड, प्रमुख पाहुणे म्हणून भास्कर बीडगर, तसेच प्रमुख वक्त्या शालेय पाठ्यपुस्तक अभ्यासक्रम निर्मिती मंडळाचा सदस्या जया इगे मॅडम, दावतपूर येथील पांडुरंग विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आंधळे मॅडम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा प्रारंभ शिक्षणाच्या ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रतिमापूजनानंतर प्रमुख पाहुण्यांचा विद्यार्थ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख मान्यवरांचे स्वागत विद्यार्थ्यींनी केले कु. अक्षदा मुंडे ,स्नेहल खोडवे, अपूर्वा शिंदे, समीक्षा काचगुंडे, समीक्षा वेडे, आदिती काचगुंडे ,आकांशा गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक कसबे सर यांनी केले. यानंतर प्रमुख वक्त्या श्रीमती जया इगे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. दरम्यान, विद्यार्थ्यांना बॅग वही ,पुस्तक, पेन आदी शैक्षणिक साहित्य मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच,ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अंगणवाडी केंद्राचे लोकार्पण सरपंच श्रीकांत भाऊ फड तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तसेच, मुख्यमंत्री लाडली बहिण , अनेक महिलांची आधार दुरुस्ती करण्यात आले .राज्याचे कृषिमंत्री मा.ना. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन पर शालेय साहित्य वाटपाचे आयोजन दावतपूरचे सरपंच श्रीकांत भाऊ फड यांनी केले. तसेच त्यांच्या सर्व टीमने महादेव गडदे उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गरड प्रदीप चंद्रकांत यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. दरम्यान महाराष्ट्रातील स्पोकन इंग्लिश ट्रेनिंग साठी अमेरिकेत जाण्यासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर अल्पोपहार देण्यात आला.यावेळी शाळेतील लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# पुष्पावती विद्यालय डिंगोरे येथे शिक्षक पालक सहविचार सभेचे आयोजन

**ओतूर । प्रतिनिधी**

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय डिंगोरे या ठिकाणी आज इयत्ता पाचवी ते सातवी दहावीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डिंगोरे गावच्या प्रथम नागरिक सीमा सोनवणे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष लक्ष्मण लोहोटे, पांडुरंग लोहोटे, विठ्ठल उकिरडे ग्रामपंचायत सदस्या निलोफर पठाण उपस्थित होत्या.याप्रसंगी विद्यार्थ्यांची शालेय शिस्त, आरोग्य, आहार, संस्कार, विविध बाह्य परीक्षा,



शालेय परीक्षा, पालकांची जबाबदारी, नवीन शैक्षणिक धोरण इत्यादी विषयांवर अनुक्रमे विजय काकडे , वैभव देशमुख, रतिलाल बागुल, किसन भुतांबरे, जगन्नाथ गाढवे यांनी माहिती व मार्गदर्शन केले.पालक मोहिनी डुंबरे, उल्हास आमले, शंकर लोहोटे, जनिषा आमले, सरपंच सीमा सोनवणे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या प्रगती विषयी समाधान व्यक्त केले पुढील काळातही पाल्यांच्या प्रगतीसाठी अपेक्षा व्यक्त केल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रेय घोलप, अनुमोदन मंगेश कोंडार ,निवेदन शिल्पा भालेराव यांनी तर उपस्थितांचे आभार विठ्ठल डुंबरे यांनी मानले. अहवाल लेखन दिनेश पाटील यांनी केले. तर कार्यक्रमाचे नियोजन मंगेश डुंबरे, बैठक व्यवस्था शिवाजी उकिरडे, रेवजी दुधावडे यांनी केली.

# ब्रिटिश कालीन विहार सरोवर शेजारी असलेला अनधिकृत स्टुडिओ कधी निष्काशित करणार ?-डॉ.माकणीकर




**मुंबई । प्रतिनिधी**

ब्रिटिश कालीन विहार सरोवर शेजारी अनेक बेकायदेशीर हॉटेल आहेत त्यापैकी टुरिस्ट नावाच्या बेकायदेशीर हॉटेल च्या मागे अनाधिकृत स्टुडिओ आहे.

त्या स्टूडियोचे कधी निष्कासन करणार? असा प्रश्न देशव्यापी संविधान जनजागृती अभियानचे राष्ट्रीय आयोजक समाजभूषण डॉ. राजन माकणीकर यांनी शासन व प्रशासनाला केला आहे.

विद्रोही पत्रकार यांनी महापालिका, पोलीस आयुक्त व प्रशस्किय सचिवांना मेल पाठवून म्हटले आहे की, अवैध्य स्टुडिओ निर्माण करून सिनेमा व टि वी मालिकांचे चित्रीकरण येथे राजरोसपणे चालवून लाखो रुपये कमावले जात आहे. सदरील स्टुडिओ हे पूर्णपणे अनधिकृत असून स्थानिक लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून चालवले जात आहे. पोलिस व पालिका प्रशासनातील बड्या अधिकार्यांपासून ते लहान कर्मचाऱ्या पर्यंत दरमहा हप्ता पुरवला जातो असे याच स्टुडिओ मालकाचा नोकर दलाल रवी शेट्टी यांनी संगितले असल्याची ग्वाही पँथर डॉ. माकणीकर यांनी लेखी स्वरूपात दिली आहे.

माकनिकर यांनी पुढे असेही म्हटले आहे की, या स्टुडिओ चे सौचालय आणि सांडपाणी सरळ विहार सरोवर मध्ये सोडण्यात आले आहे, त्यामुळे पिण्याच्या पाण्यात असे घाण पाणी सोडून मुंबई करांच्या जीवनाशी खेळला जात आहे. प्रशासन मूग गिळून गप्प आहे. याच परिसरात आदिवासी बांधवांचे वास्तव्य आहे, याच ठिकाणाहून घाण पाणी पाहते, विस्टा सोडली जाते त्यामुळे स्थानिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होवू शकतो.या घाणीच्या साम्राज्याने डेंग्यू, मलेरिया, हागवन, स्व:सन आदी सारखे गंभीर आजार पसरून आजू बाजूच्या सर्व नागरिकां च्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होवू शकतो. यात लहान बालके आणि अबालवृद्ध लवकरच प्रभावित होवू शकतात.असेही समजते की. याच ठिकाणी असलेल्या टुरिस्ट नावाच्या हॉटेल्स मधून याच ठिकाणी कपल संभोग केल्यानंतर वापरलेली कंडोम कचऱ्याच्या डब्यात टाकतात आणि येथील होटेलकडून ते कंडोम बाहेर टाकले जातात. यामुळे सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत अश्या परिस्थितीत नक्कीच रोगराई पसरून संसर्ग होवू शकतो. हे रोकने अत्यंत गरजेचे आहे.संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार तक्रारी करूनही काही फायदा होत नाही. उलट तक्रार केल्याचे अर्ज दाखवून संबंधित स्टुडिओ व हॉटेल मालकाकडून पैसे घेवून प्रकरण दाबून स्व:तचे खिसे गरम केल्याचे समजते. अशी गंभीर माहिती माकणीकर दिली आहे.सदरील हॉटेलचा दलाल म्हणून ओळखला जाणारा नोकर रवी शेट्टी माझ्याकडे तक्रार मागे घे. म्हणून रुपये ५ लाख रु घेवून एका गावगुंडा सोबत आलेला. मी ती रक्कम स्वीकारली नाही त्यामुळे मला दावूद (?) गँग च्या गुंडा कडूनही जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती, अशी ही तक्रार त्यांनी मुंबई पोलीस कमिशनर यांच्याकडे केली आहे.केलेल्या तक्रारी अर्जावर गांभीर्याने दखल घेवून वीणा परवाना अनधिकृत रित्या बांधण्यात आलेली हॉटेल्स (टुरिस्ट) व अनधिकृत स्टुडिओ वर तत्काळ बुलडोझर चढविण्याची मागणी आंबेडकरी चळवळीतील विद्रोही सामाजिक कार्यकर्ता डॉ. राजन माकणीकर यांनी केली आहे.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रातील मुख्य ईमारला गळती ; रूग्णांची हेळसांड

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना निवेदन - डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात लिंबागणेश पंचक्रोशीतील १२ वाड्यातील गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवा पुरविणाऱ्या लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य इमारतीतील स्लॅब खराब झाला असुन पावसाळ्यात थेंब थेंब पाणी टपकत असुन इमारत पुर्णतः जीर्ण झालेली आहे. इमारतीच्या स्लॅब मधुन पावसाचे पाणी झिरपत असल्याने सध्या तपासणी कक्ष,बाळंतिनी कक्ष, बाह्य रुग्ण विभाग, मिटींग हॉल,आंतररुग्ण विभाग,औषधी विभाग, व्हरांडा याठिकाणी पावसाचे पाणी साचत आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रात येत असलेल्या खेड्यापाड्यातील गोरगरीब गरजु रूग्णांची हेळसांड होत असुन तातडीने दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.सुहास गंडाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड संगीतादेवी पाटील यांना निवेदनाद्वारे केली आहे. वार्षिक नियोजन




निधीतून दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात येईल असे आश्वासन डॉ.उल्हास गंडाळ यांनी दिले.

गेल्या ३-४ वर्षांपासून पावसाळ्यात प्राथमिक आरोग्य केंद्रातील मुख्य ईमारतीसह वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी निवासस्थानांची दुरावस्था असुन निवासस्थाने पुर्णपणे नादुरुस्त असुन पावसाळ्यात पुर्ण गळती लागलेली आहे.तसेत स्वच्छता गृहे नादुरुस्त असुन पावसाळ्यात साप व विंचू आढळून येतात.त्यामुळे तेथे वास्तव्य करण्यास अडचण निर्माण झाली आहे.त्यामुळे वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहु शकत नाहीत असे पत्र तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिभा रकटे यांनी दि.१४.०९.२०२१ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना लेखी पत्रकाद्वारे कळविले होते.परंतु अद्याप निवासस्थाने दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असल्याचे लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांना सांगितले.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.उल्हास गंडाळ यांनी आरोग्य विभागाच्या बांधकाम व देखभाल दुरुस्तीसाठी केवळ वार्षिक नियोजन निधीतून तरतूद करण्याची तरतूद असुन येत्या १५ दिवसात होणा-या वार्षिक नियोजन बैठकीत याकडे प्राधान्याने लक्ष देऊन निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन डॉ.गणेश ढवळे यांना दिले.राज्याच्या आरोग्य विभागाची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत चालली असुन एकीकडे आरोग्य विभागाच्या रूग्णालय ईमारत बांधणीसाठी तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी वित्त विभागाकडून पुरेसा निधी दिला जात नाही तर दुसरीकडे हजारोंनी रिक्त असलेली वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरली जात नाहीत.ग्रामीण भागातील आरोग्याची मदार असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत वाईट आहे.याकडे शासनाने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

# उमेदवाराच्या भाऊगर्दीत संदीप गिऱ्हेंची हवा, 'उबाठा'ची मशाल पेटविणार विजयाचा दिवा

## बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात शिवसेना ठाकरे गटाची धूम

## गिऱ्हेंना मैदानात उतरवून ठाकरे गट महाविकास आघाडीचे बुरुज राखणार !

**सुरज माडूरवार । आशिष घुमे । चंद्रपूर**

राज्यात विधानसभा निवडणुकीची चाहूल लागली.चंद्रपूर जिल्ह्यात प्रत्येक पक्षाकडून तयारी सुरू झाली.मात्र यात 'उबाठा'च्या संदीप गि-हेनी घेतलेली भरारी उल्लेखनीय आहे.पायात भिंगरी घालून अल्पावधीतच त्यांनी संपूर्ण बल्लारपूर विधानसभा क्षेत्र पिंजून काढला.यादरम्यान प्रत्येक क्षेत्राला न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.साहेबांचा आदेश म्हटले की 'रिझल्ट' देणारच,या महत्वाकांक्षेपोटी क्षेत्रातील अगदी शेवटच्या माणसाला भावणार अशा जनहिताच्या कार्यक्रमाची आखणी आणि प्रस्थापितांना हादरवून सोडणारा भला मोठा महीला व तरुणाईच्या समूहाची मूठ बांधून बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात शिवसेनेच्या उबाठा गटाची मशाल पेटविली.सुधीर मुनगंटीवार सारख्या बलाढ्य उमेदवाराच्या क्षेत्रात पहिल्यांदाच गिऱ्हे यांनी रोजगाराची क्रांती घडवून आणली .

सत्ताधाऱ्यांच्या फसव्या रोजगार नीतीला कंटाळलेल्या असंख्य महिलांनी व युवकांनी 'उबाठा'ची वाट पकडली.या क्षेत्रात विधानसभा निवडणुकीत सातत्याने काँग्रेसचा पराभवच होत आला.तिथे आता संदीप गिऱ्हे यांची जोरदार हवा सुरू आहे.येथील युवकांनी त्यांना स्वीकारल्याचे दिसत आहे.तरुणाईमध्ये सहज मिसळून सोबत दिवस घालविणारा नेता या क्षेत्रातील लोकांना आपल्या हक्काचा वाटू लागला आहे.मागणी मांडून समस्या सोडविण्याची धमक गिऱ्हे यांच्यात होती,आताही दिसते.विषय हाती घेतला की 'रिझल्ट' येईपर्यंत पिछा पुरविणारा म्हणून त्यांची जिल्ह्यात ख्याती आहे.अशा नेतृत्वाची घडकेबाज तोफ बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात धडाडल्याने अनेक राजकारण्यांच्या विचाराची दिशा बदललेली तर जनतेत मोठ्या प्रमाणात परिवर्तनाचा ध्यास दिसून येत आहे.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांनी बल्लारपुर विधानसभा क्षेत्र पिंजून काढत कार्यक्रमाचा सपाटा लावला आहे.क्षेत्रातील गावा-गावात गाठीभेटी बुथ,बिएलओची बैठका, सामाजिक कार्यक्रमात हजेरी लावताना दिसत आहे.युवा असल्याने युवा वर्गांची गिऱ्हे यांना पसंती मिळत आहे.बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील दुर्गापुर, ऊर्जानगर मधे मोठ्या प्रमाणात संदीप गिऱ्हे यांचा चाहता वर्ग असल्याने त्यांची बाजू भक्कम मानल्या जात आहे.जिल्ह्यात ज्या ज्या निवडणुका गिऱ्हे यांच्या नेतृत्वात लढवल्या त्यात त्यांना यश मिळाले.बल्लारपूर विधानसभेतील पोंभूर्णा नगरपंचायतीत उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे ५ नगरसेवक आहे.बाजारसमितीतही गिऱ्हे यांच्या चाणक्य नीतीने शिवसेनेची मशाल पेटली उपसभापती पद शिवसेनेला मिळाले. भाजपच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावत



थेरगाव,आष्टा,घनोटी, वेळवा,सुशी,भवराडा,दहेली,जुनी दहेली,चोरगाव मामला,निंबाळा, शिनाडा अशा अनेक ग्रामपंचायतीत सरपंच निवडून आणले. नुकतच नागपूर येथे रुग्णवाहिका लोकार्पण कार्यक्रमात बल्लारपूर येथील तीन नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला.सोबतच मागील वर्षी जिल्ह्यात खरीप हंगामात सोयाबीन पिकावर कीड व रोगाचा व्यापक प्रमाणात प्रादुर्भाव होऊन पिकांचे नुकसान झाले होते .प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या तरतूदीतील हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या जोखमीच्या बाबी अंतर्गत अधिसूचना लागू झाली होती त्यात ४६ हजार ९९२ शेतकऱ्यांचा समावेश होता. पिक विमा कंपनीने २३ कोटी रुपये मंजूर केले होते परंतु रब्बी हंगाम सुरू होऊन देखील मागील वर्षी शेतकऱ्यांना खरीप हंगामातील नुकसान भरपाई मिळाली नव्हती. त्यातच अवकाळी पावसाचा जोरदार तडाका सुरू होता मात्र पीक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत कार्यवाही न केल्याने ओरिएंटल पिक विमा कंपनीचे कार्यालय गिऱ्हे यांनी आक्रमक भूमिका घेत कार्यालयाची तोडफोड केली व हजारो शेतकऱ्यांना पिक विमा मिळवून दिला शेतकऱ्यांना न्याय मिळाला.नुकतच मूल तालुक्यातील फीस्कुटी वीरई, चिचाळा,हळदी,ताडाळा,दहेगाव, भेजगाव या गावात पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत नाही त्यामुळे शेती ही सिंचनाच्या भरोशावर अवलंबून असते अशावेळी पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष सुरू होता त्यात गोसीखुर्द प्रकल्पाचा पाणी पुरवठा बंद होता संदीप गिऱ्हे यांनी आंदोलनाचा अलटीमेटम दिला तात्काळ सिंचाई विभागाने मागणीची दखल घेत गिऱ्हे यांना फोन वरून संपर्क साधत आंदोलन न करण्याची विनंती केली १८ ते २५ जुलै पर्यंत पाणी प्रश्न मिटेल असे आश्वस्थ केले व शेतकऱ्यांनी गिऱ्हे यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील युवाशक्तीला सक्षम करण्यासाठी २८ जुलै २०२४ ला मुल येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यात देशातील नामांकित पन्नास कंपन्या सहभागी होणार असून थेट मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांना नोकरीचे नियुक्त पत्र देण्यात येणार आहे. बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात पहिल्यांदाच गिऱ्हे यांनी रोजगाराची क्रांती घडवून आणल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

एकंदरीत बल्लारपूर विधानसभा क्षेत्रासह जिल्ह्यातील गरीब,कष्टकरी,मागासवर्गीय जनतेच्या हितासाठी वेळोवेळी आंदोलने केल्याने मोठ्या प्रमाणात गिऱ्हे यांच्या पाठीशी शेतकरी वर्ग उभा असल्याचे दिसत आहे.मंत्री सुधीर मुनगंटीवार सारख्या दिग्गज नेत्याला टक्कर देण्यास सक्षम असलेला उमेदवार म्हणूनही संदिप गिऱ्हे यांचेकडे पाहिले जात आहे.

# 'स्व-रचित रे' एका संस्मरणीय स्वरवैभवी अविष्काराचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

'स्वरचित रे' हा स्वलिखित कविता आणि गाण्यांचा संगीतमय कार्यक्रम नुकताच वरोरा येथे सादर झाला. आजवर ध्वनिमुद्रित न झालेल्या नव्याकोऱ्या रचनांचा हा कार्यक्रम शनिवार दि. १३ जुलै रोजी संध्याकाळी वरोऱ्यातील कटारिया मंगल कार्यालय येथे रंगला.





रसिकांनी हाऊसफुल्ल प्रतिसाद दिलेल्या या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार विजेते साऊंड डिझायनर मंदार कमलापूरकर व निशिगंधा कमलापूरकर (मुंबई), पराग साठे व मानसी साठे (स्वीडन) आणि पुण्याहून आलेले वादक कलाकार अशा संचाने विविध विषयांवरील कविता व गाणी सादर करत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

वरोऱ्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संगीतकार प्रा. श्रीकांत पाटील यांच्या अनेक कविता आणि संगीतरचना कार्यक्रमात समाविष्ट होत्या. तसेच मंदार कमलापूरकर, अमोल पाटील आणि इतर नामांकित कवींच्या कवितांचा आणि पराग साठे यांच्या संगीतरचनांचा कार्यक्रमात समावेश होता. पराग साठे आणि निशिगंधा कमलापूरकर यांनी सुमधुर आवाजातील गाण्यांनी उपस्थितांची मने जिंकली, तर मंदार कमलापूरकर आणि मानसी साठे यांनी निवेदन व कवितांचे अभिवाचन करत श्रोत्यांची दाद मिळवली. सुधीर टेकाळे (हार्मोनियम), अक्षय शेवडे (तबला), आदित्य आपटे (साईड रिदम्स) आणि मंदार देव (सिंथेसायझर) या वादक कलाकारांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली.

'नमो निर्गुणा रे', 'तू कशास उजळून जाशी', 'मन पिंपळाचं पान' अशा अनेक कविता, तसेच गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या कवितांवर आधारित 'भयमुक्त मन असे जेथे', 'विपत्तीतही तू मला सावरावे' अशा रचना सुश्राव्य गायनातून सादर झाल्या. तसेच 'अक़्स-ए-ख़ुशबू हूं', 'मेरे दुख की कोई दवा न करो' अशा उर्दू गझलही पेश झाल्या. तर 'पश्चिमेस फुटला मेघ', 'पालं उठली बिऱ्हाड हलले', 'असे वाटते आज पाऊस व्हावे', 'सपनें', अशा कविता अभिवाचनातून प्रभावीरीत्या या मैफलित सादर झाल्या.

मुळात इतर कवी-संगीतकारांच्या जुन्या प्रसिद्ध रचना न वापरता सादर केलेला संपूर्णपणे नवीन अस्सल रचनांचा हा अभिनव रसिकांची मने जिंकून गेला. शिवाय त्याचे सादरीकरण देखील दर्जेदार झाल्याने त्याला वरोरेकरांची उत्स्फूर्त वाहवा मिळाली.

# क्रीडामंत्री ना.संजय बनसोडे यांनी दिल्या अंबानी कुटुंबीयांना शुभेच्छा



**उदगीर । प्रतिनिधी**

उदगीर मतदार संघाचे आमदार तथा महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री नामदार संजय बनसोडे यांनी जगातील श्रीमंत उद्योगपती मुकेश अंबानी व नीता अंबानी यांचे चिंरजीव अनंत अंबानी यांचा विवाह राधिका मर्चंट यांच्याशी झाला. या शुभविवाह प्रसंगी क्रीडामंत्री संजय बनसोडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.शिल्पाताई बनसोडे यांनी अंबानी कुटूंबियांना उदगीर मतदार संघाच्या वतीने शुभेच्छा दिल्या.

यावेळी क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी, नवदांपत्य अनंत अंबानी व राधिका मर्चंट यांना विविह बंधनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उद्योगपती मुकेश अंबानी, निता अंबानी व अंबानी कुटुंबीय उपस्थित होते. मुंबई येथील जिओ वर्ल्ड सेंटर, बी.के.सी. येथे सदर शाही विवाह संपन्न झाला. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्री मोदी, विविध राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह जगभरातील दिग्गज मान्यवरांनी हजेरी लावली होती.

# पुस्तकाची वारी शाळेच्या दारी ;ग्रामगीताचार्य रामकृष्ण दादा वाचनालयाचा उपक्रम

**सेलू । प्रतिनिधी**

येथील ग्रामगीताचार्य रामकृष्ण दादा वाचनालयाने शाळेतील मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी,या उद्देशातून पुस्तकाची वारी शाळेच्या दारी हा उपक्रम आयोजित केला.



आद्य ग्रामगीताचार्य रामकृष्ण दादा बेलुरकर फिरते वाचनालय सेवाग्राम व सार्वजनिक माणिक वाचनालय श्री क्षेत्र वरखेड जि. अमरावती याच्या सहयोगातून अमरावती व वर्धा जिल्ह्यातील नऊ शाळेत २०२४ ख२०२५ या चालु शैक्षणिक वर्षात हा उपक्रम प्रत्यक्ष राबविण्यात येणार आहे.आषाढी एकादशी दिनांक १७जुलै पासुन हा उपक्रम सुरु होणार असुन पंधरा दिवसांत एक वेळा मुलांना पुस्तके देण्यात येतील.वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी, चित्रकला स्पर्धा,वाचन स्पर्धा,लेखन स्पर्धा,व मान्यवरांकडून मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येणार आहेत. प्रा,सचिन सावरकर मानीकदास बेलुरकर, ,प्रकाश आलवडकर,विजय कोल्हे,प्रा,प्रफुल्ल अंबुलकर, उध्दव साबळे, गजानन जिकार, सचीन राउत,गजानन काळे सुरेंद्र बेलुरकर याचे मार्गदर्शन लाभणार,आहेत.या उपक्रमात बापुरावजी बांगडे विद्यालय पवनार,यशवंत विधालय खरागंना गोडे,जिल्हापरिषद शाळा करंजी, काजी शाळा,वरखेड, या शाळा सहभागी होणार आहेत.या उपक्रमाला वाचनालय प्रिय व्यक्ती पुस्तक भेट देउ शकतील तसेच आपल्याकडे अडगळीत पडलेले पुस्तक भेट देऊ शकतील. इच्छुकांनी भेट द्यावी,असे आवाहन आद्यग्रामगीताचार्य रामकृष्ण दादा बेलुरकर फिरते वाचनालय सेवाग्रामच्या वतीने करण्यात आले.

# मुक्ताई धबधबा घालतोय पर्यटकांना भुरळ



**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील प्रसिद्ध असा मुक्ताई धबधबा १५ जुलैला पहाटे झालेल्या पावसाने ओसंडून वाहत आहे. व सभोवताल नटलेले हिरवेगार डोंगर व त्यामधून वाहणारा हा धबधबा प्रेक्षकांना भुरळ घालत आहे. त्यामुळे प्रेक्षकांनी या धबधब्यावर पाहण्यासाठी व आंघोळ करून मनमुराद आनंद लुटण्यासाठी तुफान गर्दी केली आहे.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये चिमूर तालुक्यातील डोमा या गावा लगत मुक्ताई देवस्थान असलेल्या व हिरवळीने नटलेल्या डोंगरावरून हा धबधबा वाहत असून जवळपास २० मीटर उंचावरून पाणी पडत असल्याने प्रेक्षकांसाठी आकर्षणाचा विषय ठरत आहे. या पर्वतावरील हिरवीगार वनराई तसेच पर्वतावरून वाहणारे पाणी याचा आनंद लुटण्यासाठी प्रेक्षकांनी बऱ्याच प्रमाणात गर्दी करायला सुरुवात केली आहे. या ठिकाणी मुक्ताई हे माना समाजाचे आराध्य देवस्थान आहे. तसेच या देवस्थान मध्ये भक्तगण भक्ती भावाने पूजा अर्चना करतात. हा धबधबा पावसाळ्यामध्ये सुरू होत असून पावसाळ्यात या ठिकाणी दूरवरून अनेक जिल्ह्यातून पाहण्यासाठी दरवर्षी पुरुष, महिला, शालेय विद्यार्थी, युवक,, युवती येत असतात. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये हा धबधबा दोन ते तीन महिने ओसंडून वाहत असतो. त्यामुळे हा धबधबा पाहण्यासाठी दूरवरून महिला पुरुष शालेय विद्यार्थी जेवणाचे डबे घेऊन तर कोणी स्वयंपाकाचे साहित्य घेऊन या ठिकाणी पार्ट्या करतात. हा धबधबा पाहण्यासाठी मुख्यता दर रविवारी शेकडोच्या संख्येने प्रेक्षकांची खूप गर्दी असते. आणि १५ ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी या ठिकाणी हजारोच्या संख्येने खूपच गर्दी बघायला मिळते. त्यामुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी या ठिकाणी पोलीस विभागातर्फे तसेच मुक्ताई सेवा समितीतर्फे तगडा बंदोबस्त असतो. या दोन ते तीन महिन्यांमध्ये परिसरातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध होत असून या ठिकाणी नाश्त्याचे तसेच वेगवेगळ्या प्रकारचे दुकाने लावली जातात. त्यामुळे बेरोजगार युवकांनाही या तीन महिन्यात सुगीचे दिवस येतात. आणि म्हणूनच या दिवसांमध्ये या स्थळाचे आकर्षण दिवसेंदिवस अधिकच वाढत असल्याने चिमूर तालुक्यातील मुक्ताई हे क दर्जाचे पर्यटन स्थळ ठरत आहे.

# नवभारत विद्यालयात वृक्षारोपण

**मुल । प्रतिनिधी**

प्रेस क्लबचे उपाध्यक्ष पत्रकार सतीश राजूरवार यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.स्थानिक नवभारत विद्यालयात विद्यालयाचे शिक्षक,कर्मचारी,प्रेस क्लबचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. पत्रकार सतिश राजुरवार यांचे हस्ते,नवभारत विद्यालयाचे परिसरात कडुलिंब या वृक्षाचे रोपण करण्यात आले.यावेळी प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय सिद्धावार, कार्याध्यक्ष अमित राऊत, सचिव कुमूदीनी भोयर,रोहीत कामडे,धर्मेंद्र सूत्रपवार, नितेश मॅकलवार,दत्ता वाराणसीवार ज्येष्ठ शिक्षक गुरु चौधरी, सेवानिवृत्त शिक्षक गुंडोजवार, मोडक, उपस्थित होते.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .